सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

GOVERNEMENT COLLEGE OF ENGINEERING,AURANGABAD
(AN AUTONOMOUS INSTITUTE OF GOVERNMENT OF MAHARASHTRA)
STATION ROAD OSMANPURA AURANGABAD – 431 005

PHONE No. (0240) 2366101 , 2366221 Fax : (0240) 2332835
Email : office.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in website : https://www.geca.ac.in

# 11th Meeting of Finance Committee

## Date : 24 th April 2019

## Minutes of Meeting

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

**इतिवृत्तान्त**

जा.क्र.शाअमऔ/अर्थसबै/लेखा/स्टेनो/२०१९/ 1480

**दिनांक :-** ३०/०४/२०१९

30 APR 2019

दिनांक २९/०४/२०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता डॉ. पी.बी. मुरनाळ, प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण व आस्थापना कक्षात अर्थ समितीची (Finance Committee) बैठक आयोजित करण्यात आली होती व खालील अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| ०१ | मा. श्री विवेक भोसले, अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ |
| ०२ | मा. श्री आर.डी. वैद्य, सदस्य, व्यवस्थापन मंडळ |
| ०३ | डॉ. पी.बी. मुरनाळ, अध्यक्ष, अर्थ समिती |
| ०४ | श्री राजकुमार आय. कोठारी, सी.ए., सदस्य अर्थ समिती |
| ०५ | डॉ. यु.जे. कहाळेकर, प्राध्यापक स्थापत्य अभि. सदस्य |
| ०६ | श्री डी.एच. चव्हाण, माहिती समन्वयक अधिकारी |

प्रथम प्राचार्यांनी सर्व मान्यवरांचे व अर्थ समिती सदस्यांचे स्वागत केले व बैठकीचा आशय सांगितला त्यानंतर बैठकीस सुरुवात करण्यात आली व बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांवर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**अजेंडा मधील अ.क्र. १ मधील -**

**बाब क्र.१)** मागील अर्थ समितीच्या जा.क्र.शाअमऔ/लेखा/२०१९/२२९ दिनांक ६/०१/२०१९ च्या बैठकीचे इतिवृत्तान्त वाचून कायम करण्यात आले.

**बाब क्र.२)** स्पार्कलेन फॅसीलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. या एजन्सीकडून टीडीएस रु.६५०६६/- कपात करावयाची बाकी होती. सदरील एजन्सीने कपात केल्याचे कळविले. परंतु एजन्सीने रक्कम कपात केल्याचा पुरावा सादर केला नाही. एजन्सी कडून टीडीएस कपाती बाबतचे आवश्यक ते प्रमाणपत्र घेण्याचे सांगितले.

**बाब क्र.३)** बाब क्र.३ बाबत चर्चा करताना पॅनकार्ड बाबत चर्चा झाली. संस्थेचा पुर्वीचा पॅनकार्ड क्रमांक AAALPO555F हा होता. आता तो नवीन AAAGG4341K करण्यात आला असून तो प्राप्त झालेला आहे. नवीन क्रमांकामुळे संस्था शासकीय असल्याचे निदर्शनास येते. या बदललेल्या पॅनकार्ड क्रमांकाच्या अनुषंगाने जीएसटी क्रमांक बदलणे बाबत कार्यवाही करण्यात येईल असे श्री कोठारी यांनी सांगितले.

(कृ.पान दोनवर पाहा)

बाब क्र.६) विभागप्रमुख एमसीए यांनी मास्टर ऑफ कॉम्पुटर अॅप्लीकेशन (एमसीए) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची शुल्क वाढीचा प्रस्ताव दिनांक २५/०१/२०१९ रोजीच्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या वैठकीत सादर करण्यात आला होता. RGECA/REG.ACAD/BOM/2019/1094 Dt. 20/03/2019 अन्वये शैक्षणीक वर्ष २०१९-२० पासून रुपये १३३००/- वरुन २०७५४/एवढी शिक्षण शुल्क आकारण्यास व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिलेली आहे. सदरील फीस वाढीबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना अवगत करणेबाबत समितीने निर्देश दिले.

बाब क्र.८) संस्थेच्या पीएलए खालील रक्कम रु.१२९५ लक्ष रु. शासनाकडे वर्ग झालेले आहे. सदरील रक्कम परत मिळविण्यासाठी ए.जी. नागपूर कार्यालया सोबत प्रत्यक्ष चर्चा करण्यात यावी व वरिष्ठ कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधून पुन्हा विनंती करण्यात यावी असे समितीने सुचविले.

अ.क्र. २) संस्थेतील आर्थिक स्थिती दर्शविणारे विवरणपत्र मांडण्यात आले असता खर्चाच्या हिशेबाचा ताळे बंद ठेवण्यायकरीता Double Entry System चा अवलंब एप्रिल २०१९ पासून करण्यात यावा असे निर्देश समितीने दिले.

अ.क्र. ३) वर्ष २०१८-१९ मधील झालेल्या खर्चाचा आढावा घेताना असे निदर्शनास आले की अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीपैकी प्रत्यक्ष खर्च हा ५० टक्केच्या आसपास झालेला आहे. याबाबत व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष व समिती सदस्यांनी नापसंती व्यक्त केली. व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष मा. श्री विवेक भोसले व सदस्य मा. श्री रवींद्र वैद्य यांनी ही बाब गंभीर असल्याचे सांगितले. तसेच शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने प्रत्येक प्रयोगशाळेसाठी आवश्यक असलेली उपकरणे दुरुस्ती व खरेदीची कार्यवाही प्राधन्याने करावी असे सांगितले.

खरेदी करताना उपकरणांचा दर्जा चांगला असण्याच्या दृष्टीने टेंडर मध्ये उपकरणाचे स्पेसीफीकेशन लिहिताना Standard Manufacturers चे नाव लिहिल्यास खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ होईल असे विभागप्रमुखांनी निदर्शनास आणले. यावर किमान (३) Manufacturers चे नाव लिहिण्यास हरकत नसल्याचे समितीने सुचविले. तसेच एकाच Manufacturers Company चे Product विकत घ्यावयाचे असल्यास व विभागाच्या समितीने सुचविल्यास विशेष बाब म्हणून प्राचार्य यांच्या लेखी संमतीने अशा प्रकारच्या उपकरणाची खरेदी करण्यास परवानगी देता येईल असेही समितीने निर्देश दिले.

अ.क्र. ४) विविध विभागांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने वर्ष २०१९-२० या वर्षासाठी अनावर्ती खर्च रु. १०६९.५७ लक्ष, आवर्ती खर्च रु. १३२३.०१ लक्ष व बांधकामासाठी रु.४३६.५१ लक्ष असे एकूण रु. २८२९.०९ लक्ष या अंदाजपत्रकास समितीने मान्यता दिली. तसेच सदरील अंदाजपत्रकानुसार होणा-या खर्चाचा आढावा नियमित घेण्यात यावा असे समितीने सुचविले.

अ.क्र. ५) आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये कर्मशाळा विभागास १५ लक्ष रु. नवीन लेथ मशीन घेण्यासाठी परवानगी प्राप्त होती. तथापि कर्मशाळा विभागाने नवीन लेथ मशीन खरेदी करणे ऐवजी कर्मशाळेतील उपलब्ध असलेली उपकरणे दुरुस्त करणे अधिक आवश्यक असल्याचे नमूद केले. त्यानुसार तातडीची बाब म्हणून प्राचार्य यांनी कर्मशाळेतील उपकरणे दुरुस्तीसाठी रु. (११.००) लक्ष खर्चास मंजुरी दिली. सदरील प्रस्तावास समितीने कार्योत्तर मंजुरी दिली.

(कृ.पान तीनवर पाहा)

**अ.क्र. ६)** सध्या एम.टेक. अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी जे शुल्क आकारण्यात येते तेवढी रक्कम एकूण शुल्क म्हणून आकारण्यात येते. तथापि एकूण शुल्क आकारताना शैक्षणिक शुल्क प्रती वर्ष १५,०००/- ऐवजी रु. २९,०००/- प्रती वर्ष आकारण्यात येते. तसेच पीएचडी अभ्यासक्रमासाठी रु. १९,०००/- प्रती वर्ष एकून शुल्क आकारण्यात येते. एम.टेक अभ्यासक्रम हा दोन वर्षांचा असून पीएचडी अभ्यासक्रम हा तीन वर्षांचा आहे. सदरील अभ्यासक्रम विद्यार्थ्याने विहित मुदतीत पूर्ण न केल्यास रु. २९,०००/- शैक्षणिक शुल्काच्या २० टक्के रक्कम प्रती वर्ष शुल्क म्हणून अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत आकारण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

शेवटी सर्वांचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

**( डॉ. पी.बी. मुरनाळ )**
प्राचार्य, तथा अध्यक्ष अर्थ समिती
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद.

प्रत :- वरील सर्व अधिकारी यांना माहितीस्तव.